स्पे.मु.नं.०१/२०२३
निशाण क्र. ३३८ ची पुरवणी

**वादी तर्फे सा.क्र. ३ यांना शपथ देण्यात आली.**

**वादी तर्फे सा.क्र. ३ चा पुढील सरतपास वादी तर्फे विधिज्ञ श्री. डी.आर. देसाई यांचे तर्फे सुरू**

बन्सी घाडगे व रावसाहेब कुलकर्णी यांना मी ओळखतो कारण ते माझे गावातील आहेत. त्यांच्यामध्ये दि. १६.४.१९९८ रोजी हक्कसोड पत्राचा दस्त झाला होता व तो मला माहित आहे. आता मला हक्कसोड पत्राचा दस्त दाखवला तो रावसाहेब कुलकर्णी यांनी स्वतः माझे समक्ष लिहिला. सदर दस्तातील मजकूर खरा आहे. सदर दस्तावर रावसाहेब कुलकर्णी यांनी तसेच साक्षीदार म्हणून मी सही केली तसेच दुसरा साक्षीदार म्हणून मोहन बोराटे यांनी सही केली. सदरचा दस्त निशाणी क्र.२९६ वर आहे.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.३ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ८, ९—अ, तसेच त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारले असता गैरहजर करिता उलटतपास नाही.**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.३ चा उलटतपास प्रतिवादी क्र. ९—ब तर्फे वकील श्री. ए.ए.पाटील यांचे तर्फे सुरु.**

मी अशिक्षित आहे. मला केवळ सही करता येते. गट नं.२१२ च्या चतुः सिमा मला माहित नाहीत. साक्षीदार स्वतः सांगतो की, मी केवळ हक्कसोड पत्राच्या दस्तावर सही केली आहे, याव्यतिरिक्त मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६.४.१९९८ रोजी रावसाहेब कुलकर्णी यांनी दावा मिळकतीबाबत हक्कसोड पत्र लिहून दिले, हे मी खोटे सांगत आहे. रावसाहेब कुलकर्णी यांनी कोणाकडून स्टॅप विकत घेतला होता हे मला माहिती नाही. हक्कसोड पत्राच्या दस्ताच्या वेळी आमच्या व्यतिरिक्त बनगे आबा हजर होते. माझेदेखत रावसाहेब कुलकर्णी यांनी पंचवीस हजार रुपये बन्सी घाडगे यांच्याकडून मिळाल्याबाबत त्यांना माझेसमक्ष पावती लिहून दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्रातील मजकूराबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**वादी तर्फे साक्षीदार क्र. ३ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१५ तर्फे वकील श्री. एस.ए.रोकडे यांचे तर्फे सुरु.**

मला दावा मिळकतीच्या चतुः सिमा सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वी दावा मिळकतीचे मालक गोपाळ कुलकर्णी, विश्वंभर कुलकर्णी व रावसाहेब कुलकर्णी हे होते. हे म्हणणे खरे आहे की, गेल्या पंचवीस वर्षापासून ते झरे गावात राहत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीस लक्ष्मण बोराटे हे कुळ होते तसेच सदर मिळकतीची वहिवाट देखील त्यांच्याकडे होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दावा मिळकती संदर्भात झालेल्या साठेखताबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.३ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १० ते १४ व १६, तसेच त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारले असता गैरहजर करिता उलटतपास नाही.**

उलटतपास पूर्ण,

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)

दि.३१.०१.२०२४ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

**वादी तर्फे सा.क्र. २ यांना शपथ देण्यात आली.**

**वादी तर्फे सा.क्र. २ चा पुढील सरतपास वादी तर्फे विधिज्ञ श्री. डी.आर. देसाई यांचे तर्फे सुरू**

लिहून घेणार बन्सी घाडगे तसेच लिहून देणार प्रभाकर कुलकर्णी, ज्ञानेश्वर व चंद्रकांत कुलकर्णी यांचे मध्ये झालेल्या वचननामा दस्ताबाबत मला माहिती आहे. सदरचा दस्त हा सोलापूर येथे लिहून दिला होता. आता मला दाखविलेला वचननामा दस्त दि.२०.०५.१९९८ चा असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. दि.२४.०७.१९९७ रोजी रक्कम रू.५०,०००/– दिली होती. दि.२९.०४.१९९८ रोजी रक्कम रू. ७२,०००/–, दि.१२.०५.१९९८ रोजी रक्कम रू.७५,०००/– अशी एकूण रक्कम रू. १,९७,०००/– इतकी रक्कम लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिले बाबत नमुद आहे. सदरचा दस्त लिहिते वेळी रक्कम रू.८,०००/– दिली. अशी एकूण रक्कम रू. २,०५,०००/– लिहून देणार यांना मिळाली. सदर दस्तांवर साक्षीदार म्हणून मी व रामचंद्र भोसले यांच्या सहया आहेत. तसेच लिहून देणार यांनी सहया केलेल्या आहेत. सदरचा दस्त निशाण क्र. २९५ वर आहे.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ८, ९–अ, तसेच त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारले असता गैरहजर करिता उलटतपास नाही.**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र. ९–ब तर्फे वकील श्री. ए.ए.पाटील यांचे तर्फे सुरु.**

करारनामा लिहून देणार घेणार हे माझे गावातील नाहीत. लिहून देणार व माझे गावचे अंतर १५ कि.मी.चे आहे. प्रस्तुत दाव्यातील झालेल्या साठेखतावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला झालेल्या व्यवहाराबाबत माहिती नाही. साक्षीदार स्वत: सांगतो की, करार नाम्यावर लिहून देणार घेणार यांनी सहया केल्यानंतर मी सही केली आहे. साठेखत झालेनंतर खरेदी खत एक वर्षात करावयाचे ठरले होते. मला दावा मिळकतीच्या चतु:सिमा माहिती नाहीत. माझे शिक्षण इयत्ता बारावी झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पुराव्याचे शपथपत्र अगोदर लिहून ठेवण्यात आले होते, त्यावर मी फक्त सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी साठेखतावरील साक्षीदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. २१२ च्या साठेखताच्या व्यवहाराबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १६.०४.१९९८ रोजी रावसाहेब कुलकर्णी यांनी दावा मिळकतीतील हक्क सोडून दिले. बन्सी घाडगे व रावसाहेब कुलकर्णी यांच्यामध्ये झालेल्या हक्कसोड दस्ताबाबत मला माहिती आहे. हक्कसोड दस्ताचा स्टॅम्प हा प्रभाकर कुलकर्णी यांनी घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. २१२ बाबत झालेल्या वचननामा, साठेखत व खरेदीखत याबाबत मला कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादी बन्सी घाडगे यांच्या सांगण्यावरुन मी आज न्यायालयात साक्षीकरिता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१५ तर्फे वकील श्री. एस.ए.रोकडे यांचे तर्फे सुरु.**

वादी बन्सी घाडगे हे माझे नातेवाईक आहेत. दावा मिळकतीचे मूळ मालक रंगनाथ आबाजी कुलकर्णी असल्याबाबत मला माहिती नाही, परंतु रंगनाथ कुलकर्णी मयत झाल्यानंतर त्यांचे वारस प्रभाकर कुलकर्णी, गोपाळ कुलकर्णी व विश्वंभर कुलकर्णी हे दावा मिळकतीचे मालक झाल्याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रभाकर, गोपाळ व विश्वंभर हे झरे येथे राहत नव्हते. दावा मिळकतीचे कुळ लक्ष्मण बोराटे असल्याबाबत मला माहिती नाही. तसेच सध्या दावा मिळकत ही कुळ म्हणून प्रतिवादी क्र.१५ यांच्या ताब्यात असल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारनाम्यावर माझी सही नाही, तसेच सदरचा करारनान्यातील व्यवहार माझे समक्ष झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१० ते १४ व १६ तसेच त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारले असता गैरहजर करिता उलटतपास नाही.**

उलटतपास पूर्ण,

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)

दि.३१.०१.२०२४

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा